**- समीर सरवटे**

(माहितीप्रसार-माध्यम, विपणन, आणि 'स्मरणिका' समिती, **बृ. म. मं. अधिवेशन २०१५, लॉस एंजलीस**)



बृहन्महाराष्ट्र मंडळाचे १७वे अधिवेशन संपून चक्क २ महिने झाले हे खरंच वाटत नाही आहे. गेली २ वर्षे हे अधिवेशन यशस्वी करण्यासाठी झटणाऱ्या २००हून अधिक स्वयंसेवकांना रोजची धावपळ, फोन कॉल्सची आठवण नक्की येत असेल. या सर्वांची मेहनत आणि एक्स्लंस शेल्टर्स (प्लॅटीनम प्रायोजक), पु.ना.गाडगीळ ज्वेलर्स, परांजपे स्कीम्स, MTDC (रौप्य प्रायोजक), मराठे ज्वेलर्स, एअर इंडीया, म्हैसकर फाउंडेशन (ब्राँझ प्रायोजक) यांच्या भरघोस पाठींब्यामुळे हे शिवधनुष्य पेलता आलं.

अधिवेशनाला येणारा वयोगट आता बदलतो आहे. आतापर्यंतच्या अधिवेशनात मुख्यत: ५० वर्षे वयानंतरचे लोक यायचे. परंतु आता तरुण पिढीने मोठ्या प्रमाणात अधिवेशनाला यायला सुरुवात केली आहे. लॉस एंजलिस अधिवेशनाला येणाऱ्या लोकांच्या पुढील वर्गवारीवरुन हे आपल्या लक्षात येईल.



अधिवेशनाची संकल्पना आणि बदलता वर्ग लक्षात घेऊन अधिवेशन समितीने कार्यक्रमांची योजना केली होती. संगीत, नाट्य, साहित्य, क्रिडा, समाजकारण या सर्व विभागांतील उत्कृष्ट कार्यक्रम निवडले गेले. बृहन्महाराष्ट्र मंडळाच्या इतिहासात प्रथमच 'रॉक कन्सर्ट' (अवधूत गुप्ते आणि वैशाली सामंत)चे आयोजन केले गेले. आनंद गंधर्व यांच्या नाट्य संगीताचा कार्यक्रमही ठेवला गेला होता. त्याच दिवशी सकाळी 'गोष्ट एका काळाची - काळ्या पांढऱ्या पडद्याची' हा प्रभात युगावरील चित्रपटांवरील कार्यक्रमही होता. महेश काळे यांच्या किर्तनाचा कार्यक्रमही जोरदार प्रतिसाद मिळवून गेला. प्रिती ताम्हनकर या १७ वर्षाखालील मुलीने आपली शास्त्रीय गायनाची तयारी दाखवून अनेक लोकांना अचंबित केले. सत्यजीत पाध्ये यांनी लहान मोठ्या सर्व मुलांना गुंगवून ठेवले. अशा विविध पिढ्यांसाठी ठेवलेल्या अनेक कार्यक्रमांमुळे ह्या अधिवेशनात खऱ्या अर्थाने 'मैत्र पिढ्यांचे' पहायला मिळाले असे म्हटले तर ती अतिशयोक्ती ठरणार नाही.

मनोरंजनाच्या कार्यक्रमांबरोबर या अधिवेशनात विचार करायला लावणाऱ्या कार्यक्रमांचीही रेलचेल होती. नमन (लेखन कार्यशाळा), नाट्य कार्यशाळा, आता पुढे काय, अल्कोहॉलिक्ससाठीचे वर्कशॉप, कुसुमाग्रजांच्या कवितांवरील कार्यक्रम, कथा कोलाज (कथावाचन), महाराष्ट्रातील मदत संस्थांची माहिती अशा अनेक विचारप्रवण आणि समाजाच्या गरजा लक्षात घेऊन केलेल्या कार्यक्रमांची योजना केली गेली होती. ५५ पेक्षा अधिक वयोगटाच्या लोकांच्या गरजा लक्षात घेऊन त्यासाठी संपूर्ण दिवसभराची कार्यशाळा भरवणे हे या अधिवेशनाचे वैशिष्ट्य म्हणावे लागेल. महाराष्ट्र टाईम्सनेही याची दखल घेऊन खास उत्तररंगवर एक लेख प्रकाशित केला. बृहन्महाराष्ट्र मंडळाचे पुरस्कार या वेळी ज्या पद्धतीने दिले गेले त्याचे सर्वांनीच कौतुक केले आहे. ज्या व्यक्तीला पुरस्कार दिला आहे त्यांचे कार्य व्हिडीओवर लोकांना पहायला मिळाले. या पुरस्कार सोहळ्याला जे महत्व द्यायला हवे ते दिले गेल्याचे आम्हाला अनेकांनी सांगितले आहे.

बाल संगोपन आणि मुलांचे कार्यक्रम उत्तम झाले अश्या प्रतिक्रिया मुले आणि पालक यांच्याकडून आल्या. "आमच्या सर्व कारकिर्दीत बृहन्महाराष्ट्र मंडळाच्यामुळे अत्यंत उत्कृष्ट मुले पाहण्याची आणि सांभाळण्याची संधी आम्हाला मिळाली “ असे child care अयोजीत करणाऱ्या 'प्ले ॲक्शन पार्टी' यांनी आवर्जून नमूद केले. त्यांना आपल्या "मराठी" मूल्यांचे खूपच कौतुक वाटले की जेथे लहानच नाही पण कुमार गटातील मुलांची वागणूक सुध्दा चांगली होती व दिलेल्या सूचना पाळत होते. त्यांनी बृहन्महाराष्ट्र मंडळाची मुले 'बाल देवदूत' आहेत ही कौतुकाची पावती दिलखुलासपणे दिली. प्रथमच १३ ते १७ वयोगटातील मुलांसाठी teen lounge ची व्यवस्था करण्यात आली होती. त्यालाही भरघोस प्रतिसाद मिळाला. मुले आणि त्यांच्या पालकांतर्फे ह्या मुलांना स्वतः check in आणि check out करण्याची परवानगी तसेच wi-fi ची खास सोय असावी अशी सूचना करण्यात आली. पुढील अधिवेशना समितीने या सूचनांचा जरूर विचार करावा.

लोकांना जेवणासाठी लांब रांगा लावायला लागल्या हे खरे असले तरी जेवणाची प्रत उत्कृष्ट होती हे आम्हाला अनेकांनी कळवले. उत्तर अमेरिकेच्या विविध भागातून आलेल्या लोकांना मराठी जेवणाबरोबर

कॅलिफोर्नियाची खासियतही कळावी म्हणून मुद्दाम मेक्सिकन जेवण एका वेळी ठेवले होते.

बिझनेस एक्स्पो विभागात अधिवेशनात पहिल्यांदाच ८० बुथ लागले होते. उपस्थीतांनी सर्व विभागात फिरून मनसोक्त खरेदी केली. अधिवेशनात पहिल्यांदाच आलेल्या रोहन बोधनकर, अभय घाणेकर, श्वेता इनामदार आणि पेडणेकर ज्वेलर्स यांनी आवर्जून त्याना आलेल्या चांगल्या अनुभवाबद्दल कळवलं. अधिवेशनाचे रौप्य प्रायोजक परांजपे स्कीम्सच्या विकस जोशीनी एकंदर व्यवस्थेबद्दल आपली पसंती दर्शवली. आलेल्या बहुतांश उपस्थीतांनीही एकंदर अधिवेशन आयोजनाबद्दल समाधान आमच्या सर्वेक्षणात व्यक्त केले.




प्रत्येक अधिवेशनामध्ये कार्यकर्त्यांची काहीतरी नवीन करायची इच्छा असते. नवीन गोष्टींमधील प्रत्येक गोष्ट लोकांना आवडतेच असे नाही, पण हे प्रयोग पुढील अधिवेशनासाठी मार्गदर्शक ठरतात. अशा प्रकारच्या प्रयोगातूनच सारेगम सारख्या यशस्वी कार्यक्रमाची परंपरा सुरु झाली आहे. याही अधिवेशनात आम्ही काही गोष्टी पहिल्यांदाच केल्या. पूर्ण दिवसाचा बिझनेस सेमिनार ज्यात पहिल्यांदार दहा यसस्वी मराठी उद्योगपती एकत्र मंचावर दिसले. तसेच मराठी उद्योजकांना पाठींबा देण्याकरता 'Pitch It Up' ही स्पर्धा घेतली. हॉलीवूड आणि मराठी सिनेक्षेत्रातील दिगज्जांना 'ला सिनेमा'च्या निमित्ताने एकत्र आणलं. उत्तररंगाचा उल्लेख वर आलाच आहे. स्मार्टफोन्सचा वाढता वापर लक्षात घेऊन पहिल्यांदाच अधिवेशनाचे ॲप तयार केले. एकमेकांचे जोडीदार शोधण्याकरता ६ महिने आधीच 'मिंगल मंगल' हे पोर्ट्ल उपलब्ध केले.

प्रयोग केले गेलेच नाहीत तर लोकांना नवीन काय आवडते ते कळणार नाही. अधिवेशन एकाच साच्यात अडकून राहील. आणि म्हणूनच पुढील अधिवेशनांनीही वेगवेगळे प्रयोग करावेत हीच आमची सदिच्छा.

***